# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/२०१८/ ३९४६
दिनांक : 2 7 AUG 2018

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपुर,

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती विहीत वेळेत सादर न केलेल्या महाविद्यालयांनी सदर माहिती ऑनलाईन सादर करणेबाबत

**संदर्भ :** प्रवेश नियामक प्राधिकरणाचे पत्र क्रमांक संकीर्ण १६-१७/प्र.क्र.२२९/प्रनिप्रा. दि.२४.८.२०१८

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ च्या कलम ९(५) च्या तरतूदीनुसार प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव संचालकांकडून प्रमाणित करून विहीत कालावधीत प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर करणे बंधनकारक आहे.

याबाबत प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती सादर करण्याबाबतचे वेळापत्रक सर्व महाविद्यालयांना कळविण्यात आले होते. तथापि काही महाविद्यालयांनी अद्याप प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती संकेतस्थळावर प्रक्रिया शुल्कासहीत सादर केलेली नाही. अशा महाविद्यालयांनी दिनांक १.९.२०१८ ते दिनांक १५.९.२०१८ पर्यंत प्रवेश प्रक्रिया शुल्क+विहीत केल्यानुसार विलंब शुल्कासहीत त्यांच्या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०१५-१६,२०१६-१७ व २०१७-१८ मधील पदव्युत्तर / पदवी / पदविका अभ्यासक्रमातील प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या www.maha-ara.org किंवा www.pnsamiti.com या संकेतस्थळावर सादर करावयाची आहे.

ज्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव प्रमाणित करून प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी विहीत केलेल्या प्रपत्रात सादर केलेली नाहीत अशा महाविद्यालयांनी त्वरीत प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयात निश्चितपणे सादर करावेत.

वरील वेळापत्रकानुसार प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती ऑनलाईन तसेच प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव सादर न केल्यामुळे संबंधित प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश नियमित न झाल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील. तसेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या प्रवेश प्रक्रियेस प्रवेश नियामक प्राधिकरणांकडून मान्यता देण्यात येणार नाही. तसेच उशिराने प्राप्त होणाऱ्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांबाबत पुढील कार्यवाही अधिनियम २०१५ च्या कलम ९(५) च्या तरतूदीनुसार विहीत करण्यात आलेल्या कालावधीसंदर्भात

शासनाच्या पुढील निर्णयास अनुसरुन राहील असे प्रवेश नियानक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी संदर्भाधीन पत्रान्वये कळविले आहे.

उपरोक्त बाब आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थांना कळविण्यात यावी व प्राधिकरणाने दिलेल्या सूचनांची गांभीर्याने नोंद घेऊन त्यानुसार कार्यवाही करण्यासंदर्भात कळविण्यात यावे.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा.सचिव,प्रवेश नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना संदर्भाधीन पत्रानुषंगाने माहितीस्तव सादर

जा.क्र. विकाअधिशा/2018/2209
सहसंचालक तंत्र शिक्षण वि.का. अमरावती
दि. 14 SEP 2018

सहसंचालक तंत्रशिक्षण
विभागीय कार्यालय, अमरावती.

प्रत.
① प्राचार्य सर्व संस्था अमरावती विभाग अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता.
② प्रोग्रामर, तंत्र शिक्षण वि.का. अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता